*संत गाडगेबाबा निर्वाणभूमी : मूलभूत सुविधांसाठी ७ कोटी रुपयांचा निधी - सुधीर मुनगंटीवार यांची माहिती*
=====================================================

मुंबई दि. १६: संत गाडगेबाबा निर्वाणभूमी, वलगाव, तालुका व जिल्हा अमरावती येथे मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ३७.८७ कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. २०१८-१९ मध्ये या आराखड्यातील कामासाठी ७ कोटी ७ लाख ६७ हजार रुपयांचा निधी नियोजन विभागाने उपलब्ध करून दिला असल्याची माहिती अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

हा निधी विभागीय आयुक्त अमरावती यांना उपलब्ध करून देण्यात आला असून यासंबंधीचा शासन निर्णय नियोजन विभागाने गुरुवारी निर्गमित केला असल्याची माहिती देऊन अर्थमंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले, यामध्ये ५३ मोठ्या बांधकामांचा तर ३१ सहाय्यक अनुदानांचा समावेश आहे. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही अर्थमंत्र्यांनी सांगितले.